


दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १०४ • पुणे • शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

# भाजप इच्छुकांची धाकधूक

## आयारामांच्या चलतीमुळे निष्ठावंतांना चिंता

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील भाजप नेतृत्वाकडून इतर पक्षांतील नेत्यांना प्रवेश देताना स्थानिक आमदारांना विश्वासात न घेण्यात आल्याने पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली होती. या वादानंतर आमदारांच्या समन्वयातून भाजपच्या कोअर कमिटीने पहिल्या टप्प्यातील सुमारे शंभर ते सव्वाशे उमेदवारांची यादी अंतिम करून ती प्रदेश कार्यालयाकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या पहिल्या यादीत आपले नाव लागेल की नाही, या संभ्रमामुळे भाजपमधील इच्छुकांची धाकधूक वाढली आहे. दरम्यान, आयारामांची चलती सुरू असल्याने निष्ठावंत कार्यकर्त्यांचा पत्ता कट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

महापालिका निवडणुकीत १२० पेक्षा अधिक नगरसेवक निवडून आणण्याचे लक्ष्य शहर भाजपने निश्चित केले आहे. त्यानुसार ज्या प्रभागांमध्ये भाजप तुलनेने कमकुवत आहे, त्या ठिकाणी इतर पक्षांतील प्रबळ नेत्यांना आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मागील काही दिवसांत वडगाव शेरी आणि खडकवासला मतदारसंघातील, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद असलेल्या भागांमधून अनेक नेते व इच्छुकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. तसेच उद्धवसेनेच्या दोन्ही गटांतील काही नेत्यांचेही प्रवेश झाले असून, पुढील दोन-तीन दिवसांत आणखी प्रवेश होण्याची शक्यता आहे. यामध्ये शिंदेसेना वगळता इतर विविध पक्षांतील नेते आणि इच्छुकांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे.



मात्र, हे पक्षप्रवेश स्थानिक आमदारांना विश्वासात न घेता झाल्याने शहर भाजपमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर कोअर कमिटीने आमदारांशी चर्चा करून १६५ पैकी सुमारे १०० ते १२५ उमेदवारांची नावे निश्चित केली आहेत. ही यादी प्रदेश कार्यालयाकडे पाठवली जाणार असून, त्यावर अंतिम मंजुरी मुख्यमंत्री देतील. उर्वरित नावांवर एकमत न झाल्याने स्वतंत्र यादी तयार करून तीही प्रदेश कार्यालयाकडे सादर केली जाणार आहे. शिवाय, शिंदेसेना आणि आठवले गटाला काही जागा सोडाव्या लागणार असल्याने भाजप नेमक्या किती जागा लढवणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, उमेदवारीचा शब्द मिळाल्यामुळेच इतर पक्षांतील अनेक इच्छुकांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे बोलले जात आहे. उमेदवारी वाटपात आयारामांना प्राधान्य मिळत असल्याची चर्चा असल्याने निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. मात्र, ज्या प्रभागांमध्ये अद्याप बाहेरच्या इच्छुकांचे प्रवेश झालेले नाहीत, त्या प्रभागांतील भाजप इच्छुक पहिल्या यादीत आपले नाव असेल का, या विचाराने चिंतेत आहेत. त्यामुळे संपूर्ण शहरात भाजपमधील इच्छुकांची धाकधूक अधिकच वाढल्याचे चित्र दिसत आहे.

## अनेकांचे भाजपातील प्रवेश थांबले

महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) यांची आघाडी होणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षातील अनेकांचे भाजपमध्ये होणारे प्रवेश थांबले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून अजित पवार हे सरकारमध्ये सहभागी झाले. त्यामुळे राष्ट्रवादी (शरद पवार) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) तयार झाले आहेत. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी, अशी निवडणूक झाली. त्यामध्ये महायुतीने बाजी मारली आणि देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे सत्तेत बसले. पुणे महापालिका निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) हे समोरासमोर येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादीला (अजित पवार) पुणे महापालिका निवडणुकीत एकटे पाडले आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस वेगवेगळ्या लढल्यास भाजपलाच फायदा होण्याची शक्यता अधिक आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास ते भाजपला काही प्रमाणात का होईना रोखणे शक्य होणार आहे. त्यादृष्टीने राष्ट्रवादीने (अजित पवार) पावले टाकत आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी आघाडीच्या निर्णयाने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील अनेकांचे भाजपमधील प्रवेश थांबले आहेत.

## भाजपाच्या सांगण्यावरून शिवसेना चालणार का?

महापालिका निवडणुकीत जागावाटपावरून महायुतीत नाराजी असल्याचे समोर आले आहे. इच्छुकांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांनी नेत्या नीलम गोऱ्हे यांच्या घरासमोर गर्दी केली आहे. शिंदेसेनेकडून भाजपाकडे २० ते २५ जागांची मागणी केली आहे परंतु भाजपा इतक्या जागा सोडण्यास तयार नाहीत. त्यामुळे शिंदेसेनेचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. पुण्यातील गोखले रोड परिसरात गोऱ्हे यांच्या निवासस्थानाबाहेर शिवसैनिकांनी गर्दी केली आहे. या कार्यकर्त्यांनी पक्षाच्या नेत्यावर गंभीर आरोप केले आहेत. पुणे शहरात फक्त ४ जण तिकीट वाटपाचा निर्णय घेत आहे. त्यात ते घरच्यांना उमेदवारी देत आहे. किमान २५ जागा पक्षाला सोडायला हव्यात परंतु घरातील लोकांचे बस्तान बसवण्यासाठी या लोकांनी शिवसैनिकांना वाऱ्यावर सोडले आहे अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. पुण्यात भाजपाने शिंदेसेनेला १० ते १५ जागा देण्याची तयारी केली आहे मात्र शिंदेंच्या कार्यकर्त्यांकडून याला विरोध होत आहे. गेली अनेक वर्ष आम्ही शिवसैनिक म्हणून काम करतोय. महायुती म्हणून लोकसभेला आम्ही काम केले, भाजपाला १०० टक्के यश मिळाले. विधानसभेतही काम केले तिथेही यश मिळाले मात्र आता महापालिका निवडणूक ही कार्यकर्त्यांची आहे. मात्र निवडणुकीच्या तोंडावर होणारे पक्षप्रवेश यावर बंदी आणली पाहिजे. जुने कार्यकर्ते मेहनत घेत आहेत असं सांगत पक्षाकडून डावलण्यात येत असल्याचा आरोप विभागप्रमुख महेंद्र जोशी यांनी केला.

## मतदारांनो, जागे व्हा; निवडणुकीत 'योग्य' उमेदवार निवडा

### घरातील, गणातील प्रश्न आजही गंभीर; आमिष नको, आश्वासन नको-काम दाखवा

**सिंहगड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्यात नुकत्याच नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका पार पडल्या असून, आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर अनेक स्वयंघोषित उमेदवार मतदारांच्या दारी जाऊन प्रचाराला लागले आहेत. मात्र, मतदारांनी यावेळी आमिष, पोकळ आश्वासने आणि भावनिक साद यांना बळी न पडता खऱ्या अर्थाने 'योग्य' उमेदवाराची निवड करण्याची गरज आहे.




घरातील आणि गणातील अनेक मूलभूत प्रश्न आजही जैसे थे आहेत. पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वीज, रोजगार अशा प्रश्नांचा डोंगर उभा असताना, निवडणूक संपल्यानंतर पश्चाताप करण्यापेक्षा यंदाच्या निवडणुकीत जागरूकपणे मतदान करून योग्य उमेदवाराला संधी देण्याची वेळ आली आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरू होताच काका, मामा, ताई, माई, दादा, आजी, भावड्या अशा नात्यांच्या हाका देत मतदारांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न अनेक उमेदवार करताना दिसत आहेत. काही उमेदवारांनी गणित जुळवत निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे, तर काहीजण समाजसेवेचं व्रत असल्याचा दावा करत मैदानात उतरले आहेत. अशा वेळी मतदारांनी नाव, नातं किंवा पक्ष न पाहता उमेदवाराचं काम, प्रामाणिकपणा आणि दृष्टिकोन तपासणं अत्यंत महत्त्वाचं आहे.

स्थानिक राजकारणात अनेक पक्ष निवडणूक रिंगणात उतरले असले, तरी जे कालपर्यंत जनतेसमोर 'शत्रू' म्हणून उभे होते, ते आतल्या बाजूने एकमेकांचे 'मित्र' असल्याचं चित्र पुन्हा एकदा स्पष्ट होत आहे. सत्ता मिळवण्यासाठी सुरू असलेली ही सोयीस्कर दोस्ती आणि वैराची नाट्ये मतदारांनी ओळखली पाहिजेत.

म्हणूनच, मतदारांसमोर उभा राहणारा उमेदवार खरोखरच जनतेसाठी लढणारा आहे की केवळ सत्तेच्या खुर्चीसाठी भूमिका बदलणारा आहे, याचा सखोल विचार होणं आवश्यक आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या राजकारणात मोजकेच पक्ष आलटून-पालटून सत्तेवर येताना दिसतात. कालचे सत्ताधारी आज विरोधक आणि कालचे विरोधक आज सत्ताधारी-ही 'संगीत खुर्ची' अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे या सत्तासंस्कृतीला छेद देण्यासाठी मतदारांपुढे नवीन, स्वच्छ आणि काम करणारा पर्याय हवा आहे, अशी भावना ठळकपणे दिसून येत आहे.

समाजसेवेची खरी तळमळ असलेल्या उमेदवारांनी दबावाला न घाबरता निवडणुकीला सामोरे जावे. तरच मतदार पारंपरिक पक्षांना बगल देऊन पर्यायी उमेदवाराला संधी देतील.






दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा



# मरता, क्या नहीं करता?

गेल्या विधानसभा निवडणुकांपासून एकत्र येणार होते, ते दोन भाऊ शुक्रवारी अधिकृतरीत्या एकत्र आले. राज्यात बऱ्याच काळापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विधानसभा निवडणुकीनंतर होणार हे उघड होतं. विधानसभा निवडणुकात हाती काही लागणार नाही, हे लक्षात आल्यानंतर निदान मुंबई महापालिकेसाठी तरी आपण एकत्र आलं पाहिजे, हे दोन्ही भावांना कळून चुकलं. अमित ठाकरे यांच्या माहीम मतदारसंघातील पराभवाने त्याला बळ पुरवलं. मूळ शिवसेनेने आधी मुंबई महापालिका जिंकली आणि त्यानंतर तिचा महाराष्ट्रात विस्तार झाला. त्यामुळे, कसंही करून मुंबई महापालिकेची निवडणूक प्रतिष्ठेने लढायलाच हवी; अन्यथा आपलं नांवच पुसलं जाईल, या भीतीने दोन्ही भाऊ एकत्र आले आहेत. त्यांच्या एकत्र येण्याचं वर्णन 'भीतीसंगम' असं करण्यात आलं आहे, ते शंभर टक्के खरंच आहे. ही स्थिती फक्त ठाकरे बंधूंची नाही, आधी विधानसभा आणि नंतर नगर परिषदा-नगरपंचायतींच्या निवडणुकीत भाजप-शिवसेनेचा जो झंझावात दिसला, त्यातून सर्वच विरोधी पक्षांची ही अवस्था झाली आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्यापासून या गोंधळलेल्या पक्षांची जी पळापळ सुरू आहे, त्यातून निवडणुकीनंतर त्यांची स्थिती काय असेल, याचा अंदाज आताच आल्याशिवाय राहात नाही.

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला तर आपण कुठे आहोत, कोणाबरोबर आणि कुठपर्यंत जाणार आहोत हेच कळेनासं झालं आहे. मुंबईत ठाकरे बंधूंनी नाकारल्यानंतर त्यांची आता काँग्रेसकडे 'घेता का बरोबर?' अशी विचारणा सुरू आहे. मुंबईबाहेर पुतणे अजित पवार यांच्यामार्फत त्यांनी महायुतीशी गुपचूप संधान बांधलं आहेच! काँग्रेसला नगरपालिका निवडणुकीत अपेक्षेपेक्षा बरं यश मिळालं असलं, तरी महापालिका निवडणुकीत काय होईल, याची कल्पना त्या पक्षात कोणालाच नाही. त्या पक्षाचे जिल्हावार नेते अधांतरी लटकत असल्यासारखी विधानं करताहेत ती त्यामुळेच. पदामुळे राज्य पातळीवरचे नेते झालेल्या प्रदेशाध्यक्षांचा आणि या नेत्यांचा संवाद अशक्य आहे. त्या पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आणि मतदार काय करतील, यावर त्यांचं निवडणुकीतलं भवितव्य अवलंबून आहे. अशा बेभरवशाच्या, कोणतीही शाश्वती नसलेल्या, 'लॉटरी'सम यशासाठीही उबाठाचे शक्यते सगळे प्रयत्न करून झाले. 'मनसेसह आपली



आघाडी शक्य नाही' असं काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी सुनावल्यानंतरच ते थोडे थंड पडले. अन्यथा,' मरता, क्या नहीं करता?' या न्यायाने जमेल तिथून ताकद मिळवण्याचे उबाठाचे प्रयत्न सुरूच आहेत. कारण, त्याशिवाय निवडणुकीत आपला निभाव लागणार नाही, याची त्यांना पूर्ण खात्री आहे! भाऊ म्हणून दोघे एकत्र आले, कुटुंबच्या कुटुंब एकत्र दिसायला लागली, हे सगळं ठीक आहे. पण, हा राजकीय देखावा किती आणि त्यात कुटुंबातल्या प्रेमाचा ओलावा किती? परस्परांविषयी विश्वास किती? मनसैनिकांना विचारा. मागच्या अनुभवांवरून त्यांचं आजही म्हणणं आहे, कधी-कुठे दगाफटका होईल, सांगता येत नाही. एकत्र येणं खरंच इतकं खरं असतं, तर जागावाटपाच्या चर्चेला इतकी लांबण लागलीच नसती. जागावाटपाच्या चर्चेत दोन्ही कुटुंबं एवढी गुंतली होती, की दोन्ही कुटुंबातल्या एकालाही नगरपालिका-नगर परिषद निवडणुकीसाठी प्रचाराला घराबाहेर पडता आलं नाही! या निवडणुका 'कार्यकर्त्यांच्या' म्हटल्या जातात. त्या निवडणुकीसाठी, कार्यकर्त्यांसाठी कोणा एकालाही थोडा वेळ काढता आला नाही. आता युतीची एकत्र गोष्ट झाली, पण जागावाटपाचं गुऱ्हाळ अजून संपलेलं नाही. जिथे मोठा गाजावाजा करूनही दोन भाऊ मनाने, विश्वासाने एक होऊ शकत नाहीत; तिथे पक्ष कधी विश्वासाने एकत्र येणार? सगळीकडे दोन भाऊ एकत्र आल्याची, कुटुंब एक झाल्याची चर्चा; पण पक्ष वेगवेगळेच राहणार असल्याची आणि व्यवहारात पुन्हा पूर्वीसारखंच कटकपट होण्याची शक्यता वर्तवली जाते आहे याचं कारण तेच आहे. सगळा आटापिटा आहे, तो मुंबई - ठाणे - पुणे - नाशिक-संभाजीनगरमधल्या मतांसाठी. तिथल्या मतदारांनी यांना मत का द्यावं? या प्रश्नाला यांच्याकडे उत्तर नाही. मराठी मतांच्या ध्रुवीकरणावर यांची सगळी भिस्त आहे. पण, दोघे एकत्र येऊनही ते शक्य नाही. कारण, यांच्याच कारकिर्दीत मुंबईची किती वाट लागली, नाशिकचं काय झालं ते मराठी माणसाने पाहिलं आहे. यांच्याच धोरणाने मराठी माणूस मुंबईबाहेर फेकला गेला. ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांत ढकलला गेलेला मराठी माणूस तिथे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत आहे. मुंबईतले शिवसेनेचे निम्म्यापेक्षा जास्त माजी नगरसेवक, शाखाप्रमुख, गटप्रमुख शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मूळ शिवसेनेत आहेत. ज्यांच्या कार्यकर्तृत्वाने मुंबईतला मराठी टक्का घसरला, तिथे उर्वरित मराठी माणसाला आता स्वतःच्या अस्तित्वाची काळजी आहे. अडचणीला जो पक्ष आपल्या दाराशी येईल, अशा पक्षांकडेच मुंबईतला मतदार वळला आहे. त्याची हिंदू अस्मिता जागृत आहे. विविध प्रांतातून आलेल्या हिंदू बांधवांबरोबर तो कामधामाने जोडलेला आहे. गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, ओडिशा, झारखंड... जिथून कुठून हिंदू बांधव मुंबईत आला, तो मुंबईत राहतो; पण त्याचं नातं त्याच्या मूळ प्रदेशातील भारतीय जनता पक्षाच्या राजवटीशी जोडलेलं आहे. मतदाराचे अनेक हितसंबंध असतात. वेगवेगळ्या कारणांनी त्याची राजकीय मतं तयार होत असतात. त्यातून तो मतदान करत असतो. त्या सगळ्या गणितात कुठल्या कुटुंबातलं कोण एकत्र आलं म्हणून किती टक्के फरक पडणार आहे? आजवरचा इतिहास काय आहे? तुम्ही लोकांसाठी, आपल्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी काय केलं? हा आहे. तिथे सारं शून्य आहे. त्यामुळे, अशा कितीही शून्यांची बेरीज केली, तरी त्याने काय होणार?

# भ्रष्टाचाऱ्यांच्या कुबड्यांवर उभी असलेली भाजपा

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

भारतीय राजकारणात स्वाभिमान, नीतीमत्ता आणि भ्रष्टाचारमुक्त कारभार या शब्दांचा सर्वाधिक वापर ज्या पक्षाने केला, तो पक्ष म्हणजे भारतीय जनता पार्टी. मात्र आजच्या वास्तवात हेच शब्द त्यांच्या कृतींशी विसंगत ठरताना दिसतात. कारण ज्या पक्षाने भ्रष्टाचाराविरोधात लढ्याचा झेंडा उभारला, त्याच पक्षाने सत्तेच्या गणितासाठी अनेक गंभीर आरोपांना सामोरे गेलेल्या नेत्यांना कवेत घेतले-आणि तरीही स्वाभिमानाच्या गप्पा सुरूच ठेवल्या. एक काळ असा होता की, भ्रष्टाचाराचा आरोप झाला की नैतिक जबाबदारी स्वीकारून पद सोडण्याची परंपरा होती. आज मात्र आरोपांचे ढग गडद असतानाही "आम्ही स्वच्छ आहोत" अशी घोषणाबाजी केली जाते. पक्षात प्रवेश करताच कालपर्यंत 'भ्रष्ट' ठरवलेले चेहरे अचानक 'स्वच्छ', 'अनुभवी' आणि 'लोकप्रिय' ठरतात-हे राजकीय पांढरपण (political whitewashing) नाही तर काय? स्वाभिमान म्हणजे फक्त भाषणांतील शब्द नाही. तो कृतीतून, निर्णयांतून आणि निवडींतून दिसतो. ज्या नेत्यांवर चौकशी, आरोप, गैरव्यवहारांची छाया आहे, त्यांना तिकीट देणे, मंत्रिपद बहाल करणे किंवा सत्तेची चावी देणे-हे स्वाभिमानाचे नव्हे, तर सत्तालोलुपतेचे लक्षण आहे. सत्ता मिळवण्यासाठी तत्त्वांना मुरड घालणे आणि नंतर जनतेला नैतिकतेचे धडे देणे-ही दुटप्पी भूमिका लोकशाहीला घातक ठरते. याहून गंभीर बाब म्हणजे, भ्रष्टाचारावर प्रश्न विचारणाऱ्यांनाच 'देशद्रोही', 'विरोधकांचे एजंट' ठरवण्याचा प्रयत्न. प्रश्न विचारणे हा लोकशाहीचा कणा आहे; तो मोडून काढून स्वाभिमानाचे ढोल वाजवणे म्हणजे जनतेच्या बुद्धिमत्तेचा अपमान आहे. खरा स्वाभिमान हा पारदर्शकतेतून येतो-निवड प्रक्रियेत स्वच्छता, आरोपांची जबाबदारी स्वीकारणे, चौकशीला सामोरे जाण्याची तयारी आणि चुकीला चुकीचं म्हणण्याचं धैर्य यातून. जेव्हा पक्ष स्वतःच्या घरात स्वच्छता ठेवत नाही, तेव्हा तो दुसऱ्यांना स्वच्छतेचे धडे देऊ शकत नाही. आज जनतेला भाषणांपेक्षा पुरावे हवे आहेत, घोषणांपेक्षा कृती हवी आहे. स्वाभिमानाची खरी कसोटी ही निवडणुकीच्या मंचावर नाही, तर निर्णयांच्या टेबलावर लागते. तोवर, भ्रष्टाचाराच्या आरोपांनी वेढलेल्या चेहऱ्यांना कवेत घेऊन स्वाभिमानाची भाषा करणे-हे केवळ ढोंगच ठरेल.

## राजकीय चर्चांना उधाण; 'आपला शरद दादा'ची सर्वत्र चर्चा

**सिंहगड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

खानापूर गणात सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले असून 'आपला शरद दादा' या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. सोशल मीडियावर झळकणारे पोस्टर, कार्यकर्त्यांमधील वाढती हालचाल आणि गावागावातील चर्चांमुळे माजी सरपंच, खानापूरचे शरद लाला जावळकर हे नाव केंद्रस्थानी आले आहे. खानापूर गणातील युवकांचा बुलंद आवाज म्हणून शरद लाला जावळकर यांची ओळख अधिक ठळक होत चालली आहे. ग्रामपातळीवर विकासकामे, सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि संघटनात्मक बांधणीमुळे त्यांना मिळणारा वाढता पाठिंबा चर्चेचा विषय ठरत आहे. विशेषतः तरुण, शेतकरी आणि सामान्य नागरिकांमध्ये त्यांच्या कार्यपद्धतीबाबत सकारात्मक मतप्रवाह दिसून येत आहे. आमदार भिमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली खानापूर गणात लहान-थोरांना सोबत घेऊन, सर्वांच्या विचारांचा सन्मान राखत काम करणारा नेता म्हणून शरद लाला जावळकर यांच्याकडे पाहिले जात आहे.

## निष्कलंक नेतृत्वावर आरोप म्हणजे सत्यावरच हल्ला

भ्रष्टाचाराचे आरोप म्हणजे विरोधकांच्या अपयशावर पडलेली धूळ : सत्ताधाऱ्यांचा घणाघाती पलटवार

**जळकोट-सचिन गंगणे (दै. आरंभ पर्व)**




आमच्या नेतृत्वावर विरोधकांकडून करण्यात आलेले भ्रष्टाचाराचे आरोप म्हणजे स्वतःच्या राजकीय अपयशावर टाकलेली धूळ असून, जनतेची दिशाभूल करण्याचा हा केविलवाणा प्रयत्न असल्याचा घणाघाती आरोप सत्ताधारी गटाकडून करण्यात आला आहे. अनेक दशकांच्या राजकीय प्रवासात विरोधकांच्या पिढ्यांनीसुद्धा आमच्या नेतृत्वावर कधीही भ्रष्टाचाराचा आरोप केला नव्हता, ही बाब आजचे आरोप किती पोकळ आहेत, हे स्पष्ट करते, असेही त्यांनी नमूद केले. निष्कलंक चारित्र्य, पारदर्शक कारभार आणि निस्वार्थ सेवेचा ठसा असलेलं आमचं नेतृत्व कधीही पदलालसेपोटी राजकारणात उतरलेलं नाही. जनतेसाठी राजकारण जगलेल्या नेतृत्वावर आरोप करणं म्हणजे सत्यालाच आव्हान देण्यासारखं असून, हा आरोपांचा मारा म्हणजे जनतेची दिशाभूल करण्याचा राजकीय कट असल्याची टीका करण्यात आली. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना आरसा दाखवत सांगितले की, तब्बल वीस वर्षांच्या सत्ताकाळात जळकोट ग्रामपंचायतीत भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले, कारभारावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आणि जनतेचा विश्वास उधळून लावला गेला. त्या अपयशाचं उत्तर देण्याएवजा आज सवाभावी नतृत्वावर आरोप करणं ही राजकीय दिवाळखोरी असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. आमचं नेतृत्व आरोपांच्या गलिच्छ राजकारणाला भीक घालत नाही. कारण त्यांच्या पाठीशी कागदपत्रांची ढाल नसून जनतेचा अढळ विश्वास उभा आहे. सत्य शांत असतं, पण खोटं मोठ्याने ओरडतं. आज आरोपांची आरोळी ऐकू येत असली, तरी उद्या निर्णय जनताच देणार असून, तो निर्णय सत्याच्या बाजूनेच असेल, असा ठाम विश्वास सत्ताधाऱ्यांनी व्यक्त केला.

## धनंजय बेनकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात सर्वप्रथम आघाडीवर असलेल्या आम आदमी पार्टीने उमेदवारी अर्ज दाखल करण्यात देखील पहिला क्रमांक मिळविला आहे. ना रस्सीखेच, तानातानी , राजकीय साद पडसाद ,घोड्या -कुरघोड्या अशा पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीची राजकीय वाटचाल यानिमित्ताने पुण्यात सुरु असल्याचे द्सिते आहे. आज ढोल ताशांच्या गजरात, शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आम आदमी पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष धनंजय बेनकर यांनी पुणे महापालिकेच्या नऱ्हे- वडगाव- धायरी प्रभाग क्रमांक ३४ अ , मध्ये निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.




यावेळी आम आदमी पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी प्रकाश जरवाल, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील, महासचिव सतीश यादव अक्षय शिंदे ,संदीप बेनकर ,अक्षय देडगे, रोहन देडगे, बाळकृष्ण आलमले, राहुल बेनकर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आम आदमी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी प्रकाश जरवाल म्हणाले की, सर्व सामान्य पुणेकरांच्या न्याय हक्कासाठी आम आदमी पक्षाने चळवळ उभी केली आहे.

त्यामुळे सर्व समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील म्हणाले , आम आदमी पक्ष हा तळागाळातील लोकांचा पक्ष आहे. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी पक्षाने सातत्याने लढा दिला आहे.

## श्री शरद जावळकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**खानापूर-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या जनसुविधा योजनेअंतर्गत व श्री शरद (लालाशेठ) जावळकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून खानापूर गावातील अंतर्गत ड्रेनेज लाईनचे काम सुरू करण्यात आले असून यासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. खानापूर गावात अंतर्गत सांडपाणी व्यवस्थेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. पावसाळ्यात



सांडपाणी रस्त्यावर साचणे, दुर्गंधी निर्माण होणे तसेच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत होता. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार श्री शरद (लालाशेठ) जावळकर यांनी सातत्याने पाठपुरावा करत आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्याकडे हा विषय मांडला होता.

# खडकवासला मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसला बळकटी

- **माजी सभापती पुजाताई पारगे व माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे यांचा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश**

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील राजकीय घडामोडींना आज नवे वळण मिळाले. माजी सभापती पुजाताई पारगे आणि माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे खडकवासला मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची



संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाली आहे. यावेळी खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नेते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पक्षप्रवेश कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण असून, आगामी काळात विकासाच्या राजकारणाला गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार म्हणाले,

"राष्ट्रवादी काँग्रेस हा विकास, सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक धोरणांचा पक्ष आहे. पुजाताई पारगे व नवनाथ पारगे यांचा अनुभव, जनसंपर्क आणि कार्यक्षमता पक्षासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल. खडकवासला मतदारसंघात विकासाची घडी बसवण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्रितपणे काम करू."

पुजाताई पारगे यांनी प्रवेशावेळी भावना व्यक्त करताना सांगितले,

"जनतेच्या प्रश्नांना प्रभावीपणे न्याय देण्यासाठी आणि विकासाची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस हाच योग्य मंच आहे. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आम्ही पक्षात प्रवेश केला आहे."

तर नवनाथ पारगे म्हणाले, "ग्रामीण व शहरी भागातील मूलभूत प्रश्न, पाणी, रस्ते, आरोग्य व शिक्षण या विषयांवर ठोस काम करण्याची संधी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे. खडकवासल्याच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही पक्षाच्या माध्यमातून सक्रिय भूमिका निभावू." कार्यक्रमात उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नव्याने प्रवेश केलेल्या नेत्यांचे स्वागत केले. या प्रवेशामुळे खडकवासला मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसला नवसंजीवनी मिळाल्याची प्रतिक्रिया कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दोडके मित्रपरिवारातर्फे उज्जैन महाकालेश्वर यात्रेचे आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) : प्रभाग क्रमांक ३२, वारजे पॉप्युलर नगर कॉलनीतील महिला भगिनींसाठी दोडके मित्रपरिवार यांच्या वतीने पवित्र उज्जैन महाकालेश्वर यात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हिंदू धर्मातील पवित्र मानली जाणारी ह्या यात्रेला नोंदणी करण्यासाठी परिसरातील महिला भगिनींकडून मोठा प्रतिसाद मिळत असून धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यात्रेसाठी विशेष रेल्वेचे आयोजन करण्यात आले असून, सर्व प्रवाशांच्या सोयीसुविधा व सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली आहे. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने ही यात्रा राबविण्यात येत असून लवकरच या यात्रेसाठी प्रस्थान होणार आहे. महिला भगिनींना भगवान महाकालेश्वराचे दर्शन घडावे, त्यांना आध्यात्मिक समाधान व सकारात्मक ऊर्जा मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील महिलांसाठी धार्मिक, सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्याचा प्रयत्न दोडके मित्रपरिवार करत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या यात्रेसाठी इच्छुक महिला भगिनींनी रोहनअण्णा धावडे (८८८८२ ८४०४०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. धार्मिक उपक्रमातून समाजातील ऐक्य आणि भक्तीभाव अधिक दृढ होणार आहे.**

### मनसे उपाध्यक्ष रमेश करंजावणे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये



**खडकवासला (आरंभ पर्व) : खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे उपाध्यक्ष , कीरकटवाडी येथील नेते रमेशअण्णा करंजावणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांचा प्रवेश झाला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे पक्षांमध्ये स्वागत केले. व त्यांच्या राजकीय सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन हा प्रवेश केल्याचे रमेश करंजावणे यांनी सांगितले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते राहुल पोकळे, शहर कार्याध्यक्ष अतुल शेठ कुदळे राज्य प्रवक्ते विकास पासलकर, माजी सरपंच सौरभ मते, अविनाश लगड उपस्थित होते. रमेश करंजवणे यांच्या प्रवेशामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला धक्का बसला आहे. पक्षाचे वीस वर्षापासून असलेले निष्ठावंत कार्यकर्ते करंजावणे यांनी पक्षप्रवेश का केला याचे कारण ही गुलदस्त्यात आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने झालेल्या या प्रवेशाकडे करंजावणे यांना कोणती संधी मिळते की काय याकडेही सर्वांचे लक्ष आहे.**

### शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेटने प्लॉटेड डेव्हलपमेंटमध्ये प्रवेश केला



**बारामती (आरंभ पर्व) : भारतातील विश्वासार्ह रिअल इस्टेट विकासकांपैकी एक असलेल्या शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेट (SPRE) ने आज पुणे ग्रोथ कॉरिडोरमध्ये 105 एकरांवरील प्रीमियम प्लॉटेड प्रकल्प 'ट्रीटोपिया' च्या माध्यमातून प्लॉटेड डेव्हलपमेंट क्षेत्रात प्रवेश केल्याची घोषणा केली. या प्रकल्पातून सुमारे ₹600 कोटींच्या महसूलाची अपेक्षा आहे. आगामी पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रस्तावित आयटी पार्क तसेच प्रस्तावित इनर आणि आउटर रिंग रोड्सजवळ स्थित असलेला हा प्रकल्प, प्लॉटेड डेव्हलपमेंटसाठी वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर SPRE च्या निवासी पोर्टफोलिओचा धोरणात्मक विस्तार आहे. या प्रकल्पात 2,000 ते 6,000 चौ.फुट क्षेत्रफळाच्या 483 नियोजनबद्ध निवासी प्लॉट्सचा समावेश असेल, जे अंतिम ग्राहक आणि दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी डिझाइन करण्यात आले आहेत. कमी घनतेचा आणि निसर्गाधारित विकास म्हणून डिझाइन करण्यात आलेल्या या प्रकल्पात सुमारे 70 टक्के क्षेत्र मोकळ्या व हिरवळीच्या जागांसाठी राखीव आहे. सुमारे 600 एकर जंगल क्षेत्राने वेढलेला हा प्रकल्प स्वच्छ हवा आणि निसर्गसंपन्न वातावरण प्रदान करतो.**




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५









# श्रीनाथ पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी कॅलेंडरचे प्रकाशन



**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

खानापूर येथील श्रीनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंथेच्या स्थापनेला 25 वर्ष पूर्ण झाली. या संस्थेची स्थापना शिवसेनेचे मा. आमदार कै प्रकाश देवळे यांचे हस्ते झाली होती. संस्थेचे संस्थापक मा. पंचायत समिती सदस्य नितीन वाघ तर अध्यक्ष मा. सरपंच नामदेवशेठ जावळकर, सचिव मा.सरपंच नारायणशेठ जावळकर आहेत. इतर संचालकांमध्ये नंदुशेठ जावळकर, सोपान जावळकर, रामदास जावळकर, राजाभाऊ जावळकर,विजय कोल्हे, पुरुषोत्तम मते, अंजली जावळकर, कमल जावळकर, राजाभाऊ चव्हाण हे आहेत. व्यवस्थापक ज्ञानेश्वर जावळकर व संतोष जावळकर आणि सह व्यावस्थापक स्मिता खाटपे आहेत. या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा आहे व खानापूर आणि नांदेड याठिकाणी शाखा आहेत. विठ्ठलवाडी हिंगणे खुर्द ते पानशेत पर्यंत खातेदार आहेत. संस्थेने अनेक छोट्या मोठ्या व्यवसायिकांना कर्ज उपलब्ध करून हातभार लावला आहे.

या संस्थेला 25 वर्ष पूर्ण झाली असून कॅलेंडरचे प्रकाशन युवासेना प्रमुख आदित्य साहेब ठाकरे यांचे शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना पुणे संपर्क प्रमुख मा. आ सचिनभाऊ अहिर, शिवसेना सचिव आदेश बांदेकर, मुंबई मा. महापौर स्नेहल ताई आंबेकर, खडकवासला संपर्क प्रमुख राजेश खाडे, स्वातीताई ढमाले,संदिप मते, गोकुळ करंजावणे, सुजाता वाघ, अनिताताई इंगळे, काका चव्हाण, सचिन पासलकर, रवी मुजुमले, बुवा खाटपे, अंकुश पायगुडे,संतोष गोपाळ,महेश पोकळे, दत्तानाना रायकर, अविनाश सरोदे,तानाजी पवळे, पुंडलिक धावडे,सौरभ मोकाशी, अभिजित पायगुडे, मछिंद्र शेलार, तानाजी गाढवे, सचिन खैरे, लहू खिरीड हे उपस्थित होते. सूत्रसंचालन इतिहास संशोधक डॉ.नंदकिशोर मते यांनी केले.

## विविध विकास कामांबद्दल पुरंदरवासीयांनी मानले शासन, प्रशासनाचे आभार

- **मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाला दिशा मिळण्याची व्यक्त केला विश्वास**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विशेषतः पुरंदर आणि लगतच्या तालुक्यांमध्ये सरकारकडून दर्जेदार विकासकामांचे जाळे उभारण्यात आल्यामुळे पुरंदर व इतर तालुक्यांच्या विकासाला योग्य दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करून पुरंदरवासीयांनी राज्य सरकार आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे आभार मानले आहेत. यासाठी गोकुळ दहीहंडी उत्सव समितीचे आनंद संजय जगताप आणि केपी फाउंडेशनचे अभिषेक राजमाने यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष आभार परिषदेचे आयोजन शिवाजीनगर,पुणे येथे करण्यात आले होते. यावेळी सर्व मान्यवर उपस्थित होते.

त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य यांचज्या योजना योग्य आणि जल्द गतीने कार्यान्वित केल्या बद्दल सार्वजनिक बांधकाम पुणे यांचे मुख्य अभियंता श्री राहणे साहेब यांचे विशेष कौतुक करण्यात आले, तसेच त्यांचे नेतृत्वात कार्यरत असलेले दक्षिण विभागाचे अधीक्षक अभियंता बाविस्कर व कार्यकारी अभियंता अनुराधा भंडारी यांचे ही आभार व्यक्त करण्याचा ठराव करण्यात आला.

## शिवसेनेच्या निवडणूक राज्य समन्वयकपदी वैभव वाघ यांची नियुक्ती

- **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ह्यांच्या आदेशाने धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षप्रमुखपदाचीही जबाबदारी**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवसेना मुख्यनेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने पुण्यातील युवानेते वैभव वाघ यांची प्रभारी 'निवडणूक राज्य समन्वयकपदी' नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षांच्या 'राज्य कक्ष प्रमुख' पदाचीही जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली आहे. या दोन्ही नियुक्तीचे पत्र नुकतेच पक्षाचे सचिव संजय मोरे यांच्या हस्ते देण्यात आले. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेली ही नियुक्ती महत्वपूर्ण आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे योग्य व्यक्तीला योग्य संधी आणि काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना ताकद देण्यासाठी संपूर्ण राज्यात प्रसिद्ध आहेत. एकनाथ शिंदे यांनी आपल्या याच स्वभाव वैशिष्ट्याला अनुसरून वंदेमातरम संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष, हाडाचे गणेशोत्सव मंडळ कार्यकर्ते, निवडणूक रणनीतीकार आणि प्रसिद्ध 'व्हायरल माणुसकी' ह्या पुस्तकाचे लेखक वैभव वाघ यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे.

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वैभव वाघ यांना पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी आणि सोलापूर या सहा महानगरपालिकांसाठी समन्वयाची जबाबदारी देण्यात आली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून शिवसेनेचा धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष हा उपक्रम सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चेचा आणि आदराचा विषय ठरत आहे. या कक्षाचे प्रमुख म्हणून जबाबदारी मिळाल्याने त्याचा लाभ राज्यातील गोरगरीब जनतेला मोठ्या प्रमाणात होईल.

या नियुक्तीबद्दल वैभव वाघ यांनी आनंद व्यक्त करीत सांगितले की, विविध नैसर्गिक आपत्ती आणि राष्ट्रीय आपत्तींच्या वेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांना प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन काम करताना पाहत आलो आहे. त्यांच्या कामाने प्रभावित होऊन काही महिन्यापूर्वी माझ्या सहकाऱ्यांसह शिवसेना पक्ष प्रवेश केला. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचून त्यांना मदत मिळवून देण्याच्या माझ्या आवडीचा आणि निवडणूका व्यवस्थापनातील माझ्या अनुभवाचा पक्षासाठी सुयोग्य वापर करण्याची संधी मला मिळाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नूतन इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये तेंग सु डो शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन

धायरी (आरंभ पर्व) : नूतन इंग्लिश मिडीयम स्कूल, रायकरमळा, धायरी येथे विनाअनुदानित खेळ प्रकारांतर्गत शालेय तेंग सु डो क्रीडा स्पर्धेचे भव्य आयोजन मंगळवार दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले. स्पर्धेसाठी सकाळी ९:३० ते १०:३० या वेळेत वजन प्रक्रिया पार पडली, तर ११ वाजता स्पर्धेला अधिकृत सुरुवात झाली. या स्पर्धेत विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कौशल्याचे प्रभावी सादरीकरण केले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभास तेंग सु डो पुणे विभागाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत राहिज, शाळेचे संचालक श्री. राजाराम डांगे, संचालिका सौ. सुनीता डांगे, मुख्याध्यापिका सौ. प्रियांका चोटलीया, विवेक माळवदे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास विशेष शोभा लाभली. या स्पर्धेचे यशस्वी आयोजन वैशाली बांगर व सुप्रिया तिर्लोटकर यांनी केले. त्यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे स्पर्धा शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड, शिस्त, आत्मविश्वास व शारीरिक तंदुरुस्ती यांना चालना मिळाल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.




### समाजवादी पार्टी पुणे महानगरपालिका निवडणूक लढवणार

पुणे (आरंभ पर्व) : आगामी पुणे महानगरपालिका निवडणूक समाजवादी पार्टी पूर्ण ताकदीने लढवणार असल्याची घोषणा करण्यात आली. या संदर्भात अधिक माहिती देण्यासाठी मंगळवारी पुणे येथील पत्रकार भवन येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेस समाजवादी पार्टीचे पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर अनिस अहमद (सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश), साधनाताई शिंदे (पुणे जिल्हा महिला जिल्हाध्यक्षा), दत्ता पाकिरे (सरचिटणीस, पुणे शहर), विनायक लांबे (कार्यकारिणी सदस्य, म.प्र.), अशोकराव गायकवाड (कार्यकारिणी सदस्य, म.प्र.), अनिरुद्ध सूर्यवंशी (उपाध्यक्ष, पुणे शहर), शहाजहान झारी (सचिव, पुणे शहर), जावेद शेख (अध्यक्ष – छत्रपती शिवाजी महाराज नगर मतदारसंघ), प्रकाश डोंबाळे (संघटक, पुणे शहर), इब्राहिम यवतमाळवाले (सदस्य, पुणे शहर), अजिम शेख (कार्याध्यक्ष – छत्रपती शिवाजी महाराज नगर मतदारसंघ) यांच्यासह भारत मालुसरे, सलिम बडगेर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी समाजवादी पार्टीची पहिली उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. त्यानुसार खालील मतदारसंघ व प्रभागांमध्ये समाजवादी पार्टी उमेदवारी करणार आहे.

## मनाच्या श्लोकांवर आधारित ऑनलाइन स्पर्धेला उस्फूर्त प्रतिसाद

### अनुराधा राजाध्यक्ष यांच्या उपक्रमातून सकारात्मक विचारांचा जागर



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

लेखिका-अभिनेत्री अनुराधा राजाध्यक्ष यांच्या संकल्पनेतून आयोजित मनाच्या श्लोकांवर आधारित ऑनलाइन स्पर्धेचे यंदा तिसरे वर्ष यशस्वीरीत्या पार पडले. भारताच्या कानाकोपऱ्यातील खेड्यापाड्यांपासून विविध राज्यांतील स्पर्धकांसह ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि अमेरिका येथूनही या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला.

मनाच्या श्लोकांचा आजच्या दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध समजावून सांगणारे व्हिडिओ अनुराधा राजाध्यक्ष यांच्या यूट्यूब चॅनेलवर प्रसारित होत असून, त्याच आधारावर स्पर्धकांनी स्वतःच्या आयुष्याशी निगडित श्लोक निवडून आपले विचार व्यक्त केले. या उपक्रमात सहा वर्षांपासून ९३ वर्षांपर्यंतच्या स्पर्धकांनी सहभाग घेतला. विशेष बाब म्हणजे ऑटिस्टिक व गतिमंद व्यक्तींनाही स्वतंत्र गटातून सहभागी करून घेण्यात आले; त्यामुळे विविध संस्था, त्यांचे विद्यार्थी-शिक्षक-पालक या उपक्रमाशी जोडले गेले.

मनाच्या श्लोकांचा सोपा अर्थ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचावा आणि सकारात्मक विचारांचा प्रसार व्हावा हा उद्देश साध्य होत असल्याचे समाधान व्यक्त करत अनुराधा राजाध्यक्ष यांनी यंदा जाहीर केलेल्या पारितोषिकांव्यतिरिक्त तब्बल ५३ अतिरिक्त रोख पारितोषिके व १४ सन्मानचिन्हे जाहीर केली. अनेक वृत्तपत्रे, मासिके, सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यालये व हितचिंतकांच्या पाठबळामुळेच हा उपक्रम सर्वदूर पोहोचल्याची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली.

स्पर्धेच्या २०२५ च्या निकालांमध्ये विविध वयोगट, खुला गट आणि विशेष गटांतील अनेक स्पर्धकांनी पारितोषिके पटकावली. लोकप्रिय व्हिडिओ या विशेष विभागात नेत्रा तुरे (मुंबई) यांना ३४०२ व्ह्यूजसह रुपये २००० चे रोख पारितोषिक जाहीर झाले. तसेच सर्वाधिक स्पर्धक संस्था म्हणून अंबज्ञ भगवद्गीता वृंद, ठाणे यांना सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.




# जनतेसाठी लढणारा जनतेचा नेता - मा. श्री. भूपेंद्र मोरे

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

लोकशाहीत खऱ्या अर्थाने नेतृत्वाची ओळख ही पदावरून नाही, तर जनतेच्या प्रश्नांसाठी उभे राहण्याच्या धैर्यावरून ठरते. नऱ्हे परिसरात अशीच एक ठाम, संघर्षशील आणि विश्वासार्ह ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे मा. श्री. भूपेंद्र मोरे. सामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना आपलेसे करून, त्या प्रश्नांसाठी सातत्याने रस्त्यावर उतरून लढा देणारा हा नेता आज नऱ्हेकरांच्या मनात "जनतेचा नेता" म्हणून मानाचे स्थान मिळवून आहे.



**सामान्यांच्या प्रश्नांचा असामान्य पाठपुरावा :** नऱ्हे परिसरातील पाणीपुरवठा, खराब रस्ते, वाहतूक कोंडी, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधा आणि प्रशासनातील दिरंगाई. हे प्रश्न वर्षानुवर्षे नागरिकांना त्रास देत होते. मात्र भूपेंद्र मोरे यांनी या समस्या केवळ कागदावर न ठेवता, त्या प्रत्यक्ष प्रशासनाच्या दारात नेल्या. तक्रारी, निवेदने, पाठपुरावा आणि आवश्यक तेव्हा आक्रमक आंदोलन-या सर्व माध्यमांतून त्यांनी नागरिकांच्या वेदनांना आवाज दिला.

> **जनतेच्या प्रश्नांसाठी न थकता लढणारा, संवादावर विश्वास ठेवणारा आणि बदल घडविण्याची क्षमता असलेला हा नेता नऱ्हेकरांसाठी आशेचा किरण आहे. जनतेसाठी लढणारा जनतेचा नेता ही ओळख भूपेंद्र मोरे यांनी आपल्या कार्यातून कमावली आहे-आणि तीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे.**

**चक्काजाम आंदोलन : संघर्षातून मार्ग काढणारा टप्पा :** नऱ्हे परिसरात झालेल्या चक्काजाम आंदोलनाने प्रशासनाचे लक्ष वेधले आणि प्रलंबित प्रश्नांना गती मिळाली. हे आंदोलन केवळ राग व्यक्त करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर नियोजनबद्ध, शांततामय आणि ठोस मागण्यांसह केलेले होते. यानंतर अनेक कामांना मंजुरी, निधी आणि प्रत्यक्ष सुरुवात मिळाली. नागरिकांच्या एकजुटीने आणि भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाने प्रशासनालाही ठोस पावले उचलावी लागली-हा बदल नऱ्हेकरांनी प्रत्यक्ष अनुभवला.

### प्रभागाचा नवउमेदवार, नव्या आशेचा चेहरा

**आज भूपेंद्र मोरे हे नऱ्हे परिसरासाठी नवी उमेद बनले आहेत. त्यांच्या संघर्षशीलतेला जनतेचा पाठिंबा आणि त्यांच्या कामगिरीला प्रत्यक्ष परिणामांची जोड मिळाल्याने, ते "नऱ्हेचा आश्वासक चेहरा" म्हणून ओळखले जात आहेत. प्रभागाबाहेरही त्यांच्या कामाचा गजर पोहोचला असून, त्यांच्या नेतृत्वाकडून अधिक व्यापक आणि दूरदृष्टीपूर्ण विकासाची अपेक्षा व्यक्त होत आहे.**

**"आंदोलन म्हणजे संघर्ष नव्हे, बदलाची सुरुवात" :** भूपेंद्र मोरे यांचा ठाम विश्वास आहे की आंदोलन हे केवळ विरोधासाठी नसते; ते बदल घडविण्याचे साधन असते. याच भूमिकेतून त्यांनी प्रत्येक आंदोलन, बैठक आणि पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे पाणीपुरवठ्याची नियमितता, कचरा व्यवस्थापनात सुधारणा, रस्त्यांचे डांबरीकरण, स्ट्रीटलाइट्स, सार्वजनिक सुविधा यांसारख्या अनेक बाबींमध्ये प्रत्यक्ष कामे मार्गी लागली.

**नागरिकांशी थेट संवाद :** भूपेंद्र मोरे यांची कार्यपद्धती पारदर्शक आहे. ते नेहमी नागरिकांच्या संपर्कात असतात. दिवस असो वा रात्र, विकासकामांचा प्रश्न असो किंवा शासकीय योजनेचा अडथळा. थेट संवाद, प्रत्यक्ष भेटी आणि वेळेवर प्रतिसाद यामुळे नऱ्हेतील नागरिकांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष विश्वास निर्माण झाला आहे. "आपला माणूस आपल्यासाठी उभा आहे" ही भावना नागरिकांना सुरक्षिततेचा आधार देते.

भूपेंद्र मोरे हे केवळ एक सामाजिक कार्यकर्ते नाहीत; ते नव्या पिढीसाठी प्रेरणास्थान आहेत. तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिक-सर्व घटकांशी त्यांनी विश्वासाचे नाते जोडले आहे. नागरिकांच्या सहभागातून स्वच्छता मोहिमा, जनजागृती उपक्रम, बैठका आणि विकासनियोजन यशस्वीपणे राबवले गेले. यामुळे समाजकारणात सहभागी होण्याची नवी ऊर्जा परिसरात निर्माण झाली आहे.

नऱ्हे परिसरात आज जे सकारात्मक बदल दिसत आहेत, त्यामागे भूपेंद्र मोरे यांचा सातत्यपूर्ण संघर्ष, नागरिकांचा विश्वास आणि एकत्रित प्रयत्नांची ताकद आहे. जनतेसाठी उभे राहणे, प्रश्नांना वाचा फोडणे आणि बदल प्रत्यक्षात उतरवणे-याच कसोटीवर भूपेंद्र मोरे यांचे नेतृत्व खरे उतरते.

प्रभाग क्र ३४ नऱ्हे, वडगाव बु॥, धायरी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
पुणे शहर



# जनसामान्यांचा बुलंद आवाज : जनसेवक भूपेंद्र मोरे

पुणे शहराच्या राजकारणात आणि समाजकारणात 'कार्यकर्ता ते जनसेवक' असा प्रवास करणारे नाव म्हणजे भूपेंद्र मोरे. केवळ आश्वासनं न देता प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून आज संपूर्ण प्रभागात त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

*** सुरक्षेसाठी रस्त्यावरची लढाई: नवले पूल अपघात आणि आंदोलन**

नवले पूल परिसरात होणारे भीषण अपघात रोखण्यासाठी प्रशासनाला जागे करण्याचे काम भूपेंद्र मोरे यांनी केले. केवळ निवेदन देऊन न थांबता, त्यांनी नागरिकांच्या सुरक्षेसाठी आक्रमक आंदोलने छेडली. त्यांच्या या पाठपुराव्यामुळेच प्रशासनाला दखल घ्यावी लागली आणि आज त्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे बदल पाहायला मिळत आहेत.

*** मूलभूत सुविधांसाठी अविरत संघर्ष**

प्रभागातील रस्ते, पाणी, वीज आणि ड्रेनेज यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी नेहमीच आक्रमक भूमिका घेतली. प्रभागातील प्रत्येक गल्लीतील प्रश्न समजून घेऊन, प्रशासकीय स्तरावर त्याचा पाठपुरावा करून अनेक प्रलंबित कामे त्यांनी मार्गी लावली आहेत.

*** महिला सक्षमीकरण आणि तरुणांना रोजगार**

भूपेंद्र मोरे यांचे कार्य केवळ बांधकामापुरते मर्यादित नाही, तर त्यांनी माणसांच्या प्रगतीचाही विचार केला आहे.

*** बचत गट:** महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी विविध बचत गटांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

*** युवा शक्ती:**

सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी 'जॉब फेअर' आणि कौशल्य विकास उपक्रमांवर त्यांनी भर दिला आहे.

*** अभ्यासू नेतृत्व आणि विकासाची दृष्टी**

भूपेंद्र मोरे हे स्वतः सुशिक्षित असल्याने प्रभागाच्या विकासाचा एक ब्लूप्रिंट त्यांच्याकडे तयार आहे. प्रभागातील कोणत्या भागात कोणती कामे प्राधान्याने करणे गरजेचे आहे, याचे सूक्ष्म नियोजन त्यांना अवगत आहे. म्हणूनच, प्रभागातील सुजाण नागरिक त्यांना एक व्हिजनरी जनसेवक म्हणून पाहतात.

*** दिग्गज नेतृत्वाचे मार्गदर्शन आणि भविष्याचा वेध**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, खासदार सुनील तटकरे आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांच्या मार्गदर्शनाखाली भूपेंद्र मोरे काम करत आहेत. या दिग्गज नेत्यांच्या विश्वासाला पात्र ठरत, प्रभागासाठी भविष्यात जास्तीत जास्त विकास निधी खेचून आणण्याची क्षमता त्यांच्यात आहे.

*** उपलब्धता:**

प्रभागातील प्रत्येक नागरिकासाठी २४ तास उपलब्ध असणारे नेतृत्व.

*** विकासाची जिद्द:**

महिला, तरुण आणि ज्येष्ठांच्या प्रश्नांची जाण असलेला जनसेवक.

*** प्रशासनावर वचक:** आंदोलने आणि पाठपुराव्याद्वारे कामे करून घेण्याची धमक.

**येणाऱ्या निवडणुकीत आपल्या प्रभागाच्या उज्वल भविष्यासाठी, सुरक्षिततेसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी भूपेंद्र मोरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहूया.**
**लक्षात ठेवा, एक योग्य निवड आपल्या प्रभागाचे भविष्य बदलू शकते!**





दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन नवले पूल अपघात संदर्भात कायमस्वरूपी उपाय योजना करण्याबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी त्यांनी तत्काळ एलिव्हेटेड ब्रिज उभारण्यास मंजुरी दिली यावेळी खा.सुनील तटकरे, राज्य महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर, भूपेंद्र मोरे, निलेश चाकणकर, सोमनाथ शेडगे उपस्थित होते.








नवले पूल परिसरात घडलेल्या अपघाताच्या पार्श्वभुमीवर प्रशासनाच्या विरोधात तिरडी आंदोलन करण्यात आले.



वारंवार नवले पूल परिसरात अपघात घडून देखील प्रशासन ठोस कायमस्वरूपी उपाययोजना करत नसल्याने प्रशासनाचा दशक्रिया विधी करण्यात आला



यम ठरलेल्या नवले पूल परिसरात स्थानिक नागरिकांच्या वतीने महामृत्युंजय आंदोलन करण्यात आले.




नऱ्हे परिसरातील नागरिकांच्या विविध समस्यांबाबत आमरण उपोषण करण्यात आले. आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने संबंधित कामे मार्गी लावली.



नागरिकांच्या विविध समस्यांबाबत अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून तत्काळ कामे मार्गी लावण्यात आली.

प्रिय बंधु–भगिनींनो,

माझी छोटीशी ओळख आपणांसमोर ठेऊ इच्छित आहे. मी एक सर्वसाधारण कुटुंबात जन्मास आलो. वडील पाटबंधारे खात्यात नोकरीला,पगार बेताचाच. त्यातही त्यांनी मला व माझ्या लहान भाऊ–बहिणीला शिक्षण दिले. २००४ साली त्यांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी घरातील मोठा म्हणुन माझ्या खांद्यावर आली. शिक्षणानंतर एका खासगी कंपनीत मी अनुभवासाठी कामाला लागलो. मात्र पगार फारसा नसल्याने उपजिवीका करण्याइतपत कमाई नव्हती. दोन्ही भावंडांची शिक्षण थांबवून मी पर्याय शोधत राहिलो व भावंडानींही घराला हातभार लावण्यासाठी छोटी–मोठी नोकरी केली. त्यानंतर इस्टेट एजंट म्हणुन काम करत बांधकाम व्यावसायिक इथपर्यंत प्रवास झाला. माझ्यासह भावंडांचीही शिक्षण पूर्ण होत संसार सुरु झाला. त्या सर्व जीवन प्रवासात आई–वडीलांची समाजाप्रती असलेली बांधिलकी व आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो हे संस्कार मनात खोलवर रुजलेले होते. सामाजिक जीवन जगत असताना अनेक समाजपयोगी कार्यक्रम हाती घेत सामाजिक कार्यात रुची निर्माण झाली. छत्रपती शिवरायांच्या विचारांचा प्रभावदेखील मनात होताच. ज्या जन्मभुमीत आपण जन्माला आलो. येथील लोक मरणानंतर आपल्या कसे लक्षात ठेवतील ? असा विचार मनात येवू लागला.

खुप धडपड करत होतो मात्र यश मिळत नव्हते. स्वप्नपुर्ती महिला फाऊंडेशन उभे करून १५०० महिलांना व्यवसायाच्या दिशेने आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण दिले. शिवराज्य समुहाची स्थापना करून विस्थापित तरूणांना एकत्र आणत छत्रपतींचे विचार सांगायला सुरुवात केली. गडकिल्ले मोहिमा राबविल्या व सलग १४ वर्षे छत्रपतींचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करून एक अविरत वाणच हाती घेतला. नागरिकांकडून स्थानिक प्रश्न सोडविण्याची आर्जव यायला लागली. मात्र सामाजिक कार्यकर्त्याकडून सामाजिक प्रश्न सोडविणे म्हणजे एक दिव्यच. अखेर २०१३ साली सक्रिय राजकारणाला सुरुवात करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. कार्यकर्ता, सरचिटणीस व खडकवासला विधानसभा मतदारसंघाचा कार्याध्यक्ष असा प्रवास आजतागायत संपन्न झाला आहे. अनेक प्रश्न संपूर्ण प्रभागात उभे आहेत. त्यांची सोडवणूक करण्यासाठी १२ मोर्चे, १३ आंदोलने, प्रसंगी उपोषण देखील केले व सोडवणूक करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. विविध क्षेत्रात कामगिरी बजावत असताना २९ रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, मोफत चष्मेवाटप, राज्यस्तरीय कबड्डी निवड चाचणी स्पर्धा, शरीरसौष्ठव स्पर्धा, चिमुकल्यांसाठी चित्रकला तसेच विविध गुणवर्धन स्पर्धा, महिलांसाठी होम मिनिस्टर आयोजन तसेच शिवजयंती, दहीहंडी, दांडिया अशा सामाजिक, राजकीय, कला व क्रीडा सर्वच स्तरांवर काम करत आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाली तरीही रस्ता, पाणी, वीज, कचरा या मुलभूत समस्यांवर निवडणुका होतात हीच शोकांतिका आहे. कोणताही राजकीय वारसा पाठिशी नाही. कोणी आमदार–खासदार नाही, किंवा साधा ग्रामपंचायत सदस्यदेखील माझ्या कुटुंबात जन्मलेला नाही. आपण संधी दिली तर प्रथम ५ वर्षांत मुलभूत प्रश्नांची सोडवणूक करत मालमत्ता करमाफी, अर्धवट असलेली दस्त नोंदणी व वाहतूक कोंडी या प्रश्नांवर गांभीर्याने काम करेन. नऱ्हे, वडगाव बु., धायरी परिसरात ई–लर्निंग स्कूल, अद्यावत वाचनालये, ठिकठिकाणी व्यायामशाळा, योगाभ्यास यासाठी प्रशस्त इमारती उभ्या करत आरोग्याच्या दृष्टीने पावले उचलणार तसेच रखडलेले डी. पी. रस्ते खुले करण्याकामी व अन्य सर्वतोपरी पूर्ण ताकदीने उपाययोजना करण्याचा प्रयत्न करेन. लोकसंपर्कातून काम करणाऱ्या तसेच आपल्या भागाची जाण असणाऱ्या व प्रश्न समजुन उत्तरे शोधणाऱ्या सुशिक्षित तरूणाच्या मागे आपण खंबीरपणे उभे रहाल यात मला शंका नाही. यदाकदाचित आपण नाकारले तर या राजकारणाच्या वाटेवर पुन्हा कधीच नाही हे शपथ घेवून सांगतो.....धन्यवाद.....!

**सौजन्य : अखिल क्रांतीनगर मित्रमंडळ**



खडकवासला मतदारसंघातील सर्व पालकांची भव्य पालकसभा घेण्यात आली. यास पालकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.




शिवराज्य समुहाच्या वतीने दरवर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते यास प्रभागातील नागरीक मोठ्या संख्येने सहभागी असतात.



दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने सहभागी झालेल्या दिंडीस मोफत पाण्याचा टँकर पुरविले जातात.




रस्त्यावर ड्रेनेजचे घाण पाणी, खड्डे याबाबत वारंवार पाठपुरावा करुनही प्रशासनाकडून दखल घेत नसल्याने प्रशासनाविरोधात रस्ताबंद आंदोलन करण्यात आले.



वारंवार ड्रेनेज ओव्हरफ्लो होत असल्याने अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जागेवर नेऊन त्याची दखल घेण्यास भाग पाडून ही कामे तत्काळ मार्गी लावण्यात आली.



स्वच्छ व दुर्गंधीमुक्त नऱ्हे हा उपक्रम हाती घेवून जन आरोग्य आंदोलन करण्यात आले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.